**महसूल विभागातील निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी/ निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी / उप जिल्हाधिकारी / तहसिलदार व नायब तहसिलदार या संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांच्या अनुषंगाने सेवाज्येष्ठता व पदोन्नतीबाबतची कार्यपध्दती...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१२०/आस्था-०१ (ई-१७०६४१४)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक २८ जुलै, २०२६**

**संदर्भ:-** १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.मलोआ-२४१८/प्र.क्र.१३६/ई-३, दि.१०.०५.२०२१
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.धोरण-२०२२/प्र.क्र.३१/ई-९, दि.१३.०४.२०२२
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२२/प्र.क्र.३०३/ई-९, दि.९.१०.२०२४
४) महसूल व वन विभाग, शासन अधिसूचना क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२१७/आस्था-१, (ई-१२९२१८६/१७३६०७५), दि.२०.०७.२०२६

**प्रस्तावना:-**

महसूल विभागातील निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसिलदार व नायब तहसिलदार या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम संदर्भ क्र.४ येथील शासन अधिसूचनेन्वये अस्तित्वात आलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमांची अंमलबजावणी, सेवाज्येष्ठता व पदोन्नतीबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महसूल विभागातील निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसिलदार व नायब तहसिलदार या सर्व संवर्गांचे यापूर्वीचे सेवाप्रवेश नियम अधिक्रमित करुन संदर्भ क्र.४ येथील अधिसूचनेन्वये सुधारीत सेवाप्रवेश नियम लागू करण्यात आले आहेत. संदर्भ क्र.१ ते २ येथील शासन निर्णय अधिक्रमित करून संदर्भ क्र.४ येथील शासन अधिसूचनेन्वये विहित करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ पुढील कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे:-

२. सदर सेवाप्रवेश नियमांमध्ये नमूद सेवाविषयक बाबींव्यतिरिक्त उर्वरित सेवाविषयक बाबींसाठी शासनाने अधिसूचना, नियम, शासन निर्णय, परिपत्रक इत्यादी अन्वये वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या तरतुदी लागू राहतील.

३. संदर्भ क्र.४ येथील अधिसूचनेन्वये प्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार यापुढे निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी व उप जिल्हाधिकारी हे दोन स्वतंत्र संवर्ग असून त्यांच्या सेवाज्येष्ठता याद्या स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येतील.

४. निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी संवर्गाच्या स्वतंत्र सेवाज्येष्ठता यादीच्या आधारे अपर जिल्हाधिकारी संवर्गाची पदोन्नतीची प्रकिया राबविण्यात येईल.

५. उप जिल्हाधिकारी गट-अ हे पद धारण करणारे तसेच उक्त पदावर प्राप्त झालेल्या नियमित दिनांकापासून सलग तीन वर्ष सेवा कालावधी पूर्ण झालेले अधिकारी निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी पदावर पदोन्नतीस पात्र असतील.

६. निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसिलदार व नायब तहसिलदार या संवर्गांच्या स्वतंत्र सेवाज्येष्ठता याद्या महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मध्ये विषद केलेल्या तरतुदीनुसार प्रतिवर्षी १ जानेवारी रोजी प्रसिद्ध करण्यात येतील. नायब तहसिलदार या संवर्गाच्या सेवाज्येष्ठता याद्या विभाग स्तरावर विभागनिहाय स्वतंत्रपणे व त्यानंतर राज्य स्तरावर एकत्रितरित्या प्रसिद्ध करण्यात येतील.

७. संदर्भ क्र.४ येथील अधिसूचनेन्वये प्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार तहसिलदार व नायब तहसिलदार हे दोन्ही संवर्ग आता राज्यस्तरीय संवर्ग राहतील. तहसिलदार संवर्गांच्या सेवाज्येष्ठता याद्या राज्यस्तरावर ठेवण्यात येतील तसेच बिंदुनामावली, सरळसेवा भरतीची मागणीपत्रे, बदल्या, पदोन्नती इ. प्रकिया राज्यस्तरावरुन राबविण्यात येईल.

८. संदर्भ क्र.४ येथील अधिसूचनेमध्ये सहायक महसूल अधिकारी, गट-क आणि मंडळ अधिकारी, गट-क या संवर्गातील कर्मचाऱ्यांना नायब तहसिलदार पदावर पदोन्नती देण्याचे प्रमाण प्रत्येक विभागासाठी प्रत्येक संवर्गाची संख्या विचारात घेऊन शासनाकडून सर्वसाधारण किंवा विशेष आदेश अथवा शासन निर्णयाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल अशी तरतूद आहे. त्यानुषंगाने, सर्व महसुली विभागांसाठी नायब तहसिलदार संवर्गामध्ये सहायक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नती देण्यासाठी निश्चित केलेल्या प्रमाणाचा फेरआढावा घेऊन संदर्भ क्र.३ येथील दि.०९.१०.२०२४ चा शासन निर्णय अधिक्रमित करून खालील प्रमाण निश्चित करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | विभागाचे नाव | सहायक महसूल अधिकारी | मंडळ अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | कोकण | २.४३ | १ |
| २ | नाशिक | १.३९ | १ |
| ३ | पुणे | १.३५ | १ |
| ४ | नागपूर | १.९३ | १ |
| ५ | अमरावती | १.७३ | १ |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | १.८१ | १ |

टीप:- पदोन्नतीने भरावयाच्या पदांचे प्रमाण हे नायब तहसिलदार संवर्गामध्ये रिक्त होणाऱ्या पदांसाठी लागू करावयाचे नसून, ते नायब तहसिलदार संवर्गातील पदोन्नतीने भरावयाच्या एकूण पदसंख्येला लागू करावयाचे आहे. सदर प्रमाणाची अंमलबजावणी सन २०२६-२७ च्या निवडसूची वर्षापासून लागू करण्यात येत आहे.

त्यानुसार सदर संवर्गाच्या पदोन्नतीबाबतची प्रक्रिया प्रचलित पध्दतीप्रमाणे विभागनिहाय परंतु राज्यस्तरावरून राबविण्यात येईल.

९. गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांना नायब तहसिलदार पदावरील पदोन्नतीनंतरची पदस्थापना कार्यरत महसूल विभागात करण्यात येईल.

१०. नायब तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.९/०४/२०१८ मधील तरतुदीनुसार करण्यात येतील.

११. नायब तहसिलदार संवर्गाच्या आंतरविभागीय बदल्या ह्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार प्रत्येक विभागांतर्गत मंजूर पदसंख्येच्या ८०:२० (पदोन्नती/सरळसेवा) ह्या प्रमाणातच करण्यात येतील. यासाठी खालील उदाहरणे विचारात घेता येतील.

उदा.- (१) नागपूर विभागातील सहायक महसूल अधिकारी संवर्गातील एका पदोन्नत नायब तहसिलदाराची बदली पुणे विभागातील दुसऱ्या एखाद्या सहायक महसूल अधिकारी संवर्गातील पदोन्नत नायब तहसिलदाराच्या अन्य विभागातील बदलीने रिक्त होणाऱ्या जागेमुळे पुणे विभागात करता येईल.

उदा.- (२) अमरावती विभागातील मंडळ अधिकारी संवर्गातील एका पदोन्नत नायब तहसिलदाराची बदली छत्रपती संभाजीनगर विभागातील दुसऱ्या एखाद्या मंडळ अधिकारी संवर्गातील पदोन्नत नायब तहसिलदाराच्या अन्य विभागातील बदलीने रिक्त होणाऱ्या जागेमुळे छत्रपती संभाजीनगर विभागात करता येईल.

उदा.-(३) नाशिक विभागातील एका सरळसेवेच्या नायब तहसिलदाराची बदली कोकण विभागातील दुसऱ्या एखाद्या सरळसेवेच्या नायब तहसिलदाराच्या अन्य विभागातील बदलीने रिक्त होणाऱ्या जागेमुळे कोकण विभागात करता येईल.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२८१८०७२८७२४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.07.28 18:18:43 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास/गृहनिर्माण) यांचे सचिव

४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क,क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव

५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. विभागीय आयुक्त (सर्व)
११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी (सर्व)
१३. निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी (सर्व)
१४. अपर जिल्हाधिकारी (सर्व)
१५. निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी (सर्व)
१६.उप जिल्हाधिकारी (सर्व)
१७. तहसिलदार (सर्व)
१८. नायब तहसिलदार (सर्व)
१९. निवडनस्ती (आस्था-०१).